# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## दिनांक ११/०८/२०२४ (रविवार)

---

### जिवे मारण्याचा प्रयत्न करणा—या आरोपींवर कारवाई

पोलीस स्टेशन केळवद येथे दिनांक ०९/८/२४ चे २०/०० ते २०/३० वा. दरम्यान, फिर्यादी नामे—नरेश चैतराम पाटील वय ५१ वर्ष रा तिष्ठी मोठी ता कळमेश्वर हे आपले परिवारासह घरी हजर असता **आरोपी नामे**—हरिचंन्द भाउराव चंन्द्रकापूरे वय ३४ वर्ष रा. मोठी तिष्ठी ता कळमेश्वर **हा हातात कू—हाड घेवून, फिर्यादीचे घरात आला व म्हणाला की "तूम्ही माझा विरोधात पोलीस स्टेशनला रिपोर्ट दिली आहे " असे म्हणुन फिर्यादीला जिवानीशी ठार मारून टाकीन असे म्हटले व आरोपी हा आपले हातातील कू—हाडी ने फिर्यादीला मारण्यास गेला असता, फिर्यादीची पत्नी सौ. मलका नरेश पाटील वय ४८ वर्ष रा कळमेश्वर ही मध्यस्थी आल्याने कु—हाडी चा मार फिर्यादीच्या पत्नीच्या डाव्या हाताला लागला, त्यानंतर सूध्दा कू—हाडी ने वार केला परंतू फिर्यादीचे पत्नीने हात पूढे केल्याने पुन्हा तिचे हातावर लागले नंतर परत आरोपीने तिसरा वार कु—हाडी ने फिर्यादीचे छातीवर केला व फिर्यादीच्या हातावर चावा घेवून जोरजोराने ओरडुन, म्हणाला की, तूम्हाला जिवाने ठार मारून टाकीन"तूम्ही माझे विरूध्द पोलीस स्टेशनला तक्रार दिली" या कारणावरून आरोपीने फिर्यादीचे पत्नीला ओढत घराबाहेर काढले.** अशा फिर्यादीच्या रिपोर्ट व डॉक्टरी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन केळवद येथे आरोपीविरूध्द कलम ३३२(सी),१०९ भारतीय न्याय संहीता अन्वयें गुन्हा नोंद करून तपासात आहे. सदर गुन्हयातील आरोपीस अटक करण्यात आली असुन पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्री गेडाम पो स्टे केळवद मो. क्र. ७७२२० ००३४३ हे करीत आहे.

### दुचाकी चोरी करणा—या आरोपीस अटक

पोलीस स्टेशन रामटेक येथे फिर्यादी नामे—गजानन सिताराम सलामे वय ७५ वर्ष रा कांद्री वस्ती यांनी दिनांक ०८.०८.२४ चे १७.३० वा ते १८.३० वा दरम्यान आपली मोटर सायकल क्र एम एच ४० एजी ७०९८ हीरो होन्डा ग्लॅमर किमती २००००/—रू ची मनसर येथे रोडच्या बाजुला उभी करून ठेवली असता कोणीतरी अज्ञात आरोपीने सदर मोटर सायकल चोरून नेल्याचे रिपोर्टवरून सदर गुन्हा नोंद करून तपासात होता. सदर गुन्हयाचा सखोल तपास केला असता, व आजुबाजुच्या परीसरात विचारपुस केली असता सदर नमुद गाडी ही आरोपी नामे—तुशार गुरखे रा कन्हान ता पारशिवनी याने चोरून नेल्याचे माहीती मिळाल्याने सदर आरोपीस ताब्यात घेवुन विचारपुस केल्याने त्याने नमुद मोटर सायकल चोरून नेल्याचे सागितल्याने आरोपी नामे तुशार राजेश गुरखे वय २२ वर्ष रा कन्हान पारशिवनी यास अटक करण्यात आली असुन त्याचे कडुन दुचाकी वाहन जप्त करण्यात आले आहे. सदर गुन्हयातील पुढील तपास पोना /गोपाल डोकरमारे मोनं ९७६४२८५९८८ हे करीत आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनात पोस्टे रामटेक येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक श्री काळे व त्यांचे स्टाफ यांनी पार पाडली.

## दुचाकी चोरी करणा—या आरोपीस अटक

पोलीस स्टेशन सावनेर येथे फिर्यादी नामे—मुकुल जयवंत गोतमारे वय २४ वर्ष रा बोरगाव ता कळमेश्वर यांनी दिनांक १०.०८.२४ चे १३.३० ते १२.५० वा दरम्यान आपली मोटर सायकल क्र एम एच ३१ सीयु ४६५० किमती ३००००/—रू ची ऋषी ठाकरे यांचे झेरॉक्स दुकानाचे समोर लॉक करून ठेवली असता कोणीतरी अज्ञात आरोपीने सदरची मोटरसायकल चोरून नेल्याचे रिपोर्ट वरून सदर गुन्हा नोंद करून तपासात होता. सदर गुन्हयाचा सखोल तपास केला असता, व आजुबाजुच्या परीसरात विचारपुस केली असता सदर नमुद गाडी ही आरोपी नामे—अंकुश शंकर धुर्वे वय २४ वर्ष रा आजनी ता सावनेर याने चोरून नेल्याचे माहीती मिळाल्याने सदर आरोपीस ताब्यात घेवुन विचारपुस केल्याने त्याने नमुद मोटरसायकल चोरून नेल्याचे सागितल्याने त्यास नमुद गुन्हयात अटक करण्यात आली असुन त्याचे कडुन दुचाकी वाहन जप्त करण्यात आले आहे. सदर गुन्हयातील पुढील तपास पोलीस हवालदार श्री बंन्सोड मोक्र ९८५०९६१२५8 हे करीत आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनात पोस्टे सावनेर येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक श्री रविद्र मानकर व त्यांचे स्टाफ यांनी पार पाडली.

पोलीस माहीती कक्ष
नागपुर ग्रा जिल्हा नागपुर